



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ




dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १९ फेब्रुवारी २०२५ | अंक ७२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# मनोज जरांगे यांची मोठी घोषणा, गावकऱ्यांच्या समस्येचं निराकरण करण्यासाठी उचलले हे पाऊल


## हाके यांनी अकलेनं बोललं पाहिजे

लक्ष्मण हाके यांनी दावा केला कि धस आणि मुंढे यांची जशी भेट झाली तशी जरांगे आणि कराड यांची भेट झाली होती. यावर जरांगे म्हणाले मी त्यांना विरोधक मानत नाही. त्यामुळे मी त्यांच्यावर बोलत नाही. महत्व देत नाही.अकलेनं बोललं पाहिजे. तो आम च्याकडे आला होता आणि हे त्याच्याकडे गेले होते. जेव्हा तो आला होता तेव्हा मुंडे यांनी त्याची मला ओळख करून दिली होती असे जरांगे यांनी सांगितले.

### तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांना भेटावे का !

दिशा सालियन सारखे देशमुख यांचे आरोपी मिळत नाहीत का ? असा सवाल भाजपा मंत्री नितेश राणे यांनी केला आहे. यावर जरांगे म्हणाले,की त्या खुनाशी या खुनाची तुलना कशी होईल ? आणि सरकार तुमचं आहे आणि तुम्ही प्रश्न विचारायचे म्हणल्यावर या राज्यातील लोकांना तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांना भेटावं लागेल, असा खोचक टोला जरांगे यांनी लगावला आहे.

## मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळालेच पाहीजे



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज हिंगोली दौ-यावर होते.आजेगाव येथे उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचं अनावरण मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जरांगे पाटील यांनी महारष्ट्रातील प्रत्येक गावात लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी एका सेवकाची नियुक्ती करणार असल्याची घोषणा केली आहे. आम्ही करोडोने एकत्र आलो, मात्र गोरगरीबांच्या समस्या आणि अडी अडचणीचं काय? आरक्षणातून नोकरी आणि शिक्षणाचा प्रश्न सुटेल, पण आम्ही जे चित्र बघितलं आहे. ते गावातील समस्येचं काय ते कुणाला सांगत असतील? त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक गावात आता एक सेवक म्हणून द्यायचे आम्ही ठरवलं आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक गावातून एका सेवकाला २२ फेब्रुवारी ते २२ मार्चपर्यंत येण्याचं आवाहन जरांगे यांनी यावेळी केले आहे. उज्वल निकम यांना कधी नेमणारसुप्रिया सुळे बीडमध्ये येत आहेत न्याय मिळत नाही का? असा प्रश्न विचारला असता जरांगे म्हणाले की असा काय होत आहे कि तुम्हाला एक




आरोपी पकडायला दोन महिने का लागत आहेत.मुख्यमंत्री सांगतात कि एकही आरोपी सुटणार नाही, यांनी पडकलेच नाहीत, त्यामुळ ते सुटायचा प्रश्न नाही असा टोला जरांगे यांनी लगावला आहे.यांनी अजून सह आरोपी बनवलेले नाहीत, त्या आरोपीना सांभाळणारे लोक असतील. उज्वल निकम यांची निवड अद्याप केलेली नाही,मग त्या चार्जशिटच पुढे काय होणार कसं होणार यात काही पोलीस अधिकारी आहेत त्यांना तुम्ही सहआरोपी किंवा निलंबित केलेले नाही.त्यामूळ संशय येतो आहे की न्याय मिळणार कसा..?लक्ष्मण हाके यांनी दावा केला कि धस आणि मुंढे यांची जशी भेट झाली तशी जरांगे आणि कराड यांची भेट झाली होती. यावर जरांगे म्हणाले मी त्यांना विरोधक मानत नाही. त्यामुळे मी त्यांच्यावर बोलत नाही. महत्व देत नाही.अकलेनं बोललं पाहिजे. तो आमच्याकडे आला होता आणि हे त्याच्याकडे गेले होते. जेव्हा तो आला होता तेव्हा मुंडे यांनी त्याची मला ओळख करून दिली होती असे जरांगे यांनी सांगितले. तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांना भेटावे का !

दिशा सालियन सारखे देशमुख यांचे आरोपी मिळत नाहीत का ? असा सवाल भाजपा मंत्री नितेश राणे यांनी केला आहे. यावर जरांगे म्हणाले,की त्या खुनाशी या खुनाची तुलना कशी होईल ? आणि सरकार तुमचं आहे आणि तुम्ही प्रश्न विचारायचे म्हणल्यावर या राज्यातील लोकांना तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांना भेटावं लागेल, असा खोचक टोला जरांगे यांनी लगावला आहे.पोलीस आणि आरोपींची मिली भगत देशमुख प्रकरणात पोलीस आणि आरोपींची मिली भगत आहे. त्याशिवाय एवढं मोठ प्रकरण होऊ शकत नाही.धनंजय देशमुख फोन करत होते, पोलिसांना माझा भाऊ पंधरा मिनिटात आणतो. पण ते चार तास होऊनही येत नाहीत. त्यानंतर त्यांचा खून झाल्याची बातमी येते. त्यामुळे पोलिसांपासून ते खंडणीखोरापर्यंत सगळे दोषी आहेत असा आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे. आमची मागणी आहे. या सगळ्यांना फाशी झाली पाहिजे नाहीतर राज्यात उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पळाला पाहिजे अशीही मागणी जरांगे यांनी केली आहे.






संपादकीय

## ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशनार्थ

# बदलती माध्यमं आणि बदलणारी भाषा

भाषा ही माणसाला मिळालेली सर्वात मोठी देणगी होय. भाषा ही संस्कृतीची वाहक आहे.भाषेशिवाय मानवी अस्तित्व आणि मानवी संस्कृती यांची कल्पनाही करणे अशक्य. मानवी जीवनातील आणि अर्थातच मानवी संस्कृतीतील संचित भाषेच्या माध्यमातूनच एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित झाले आहे. भाषा कुठून येते ? आपण ' मातृभाषा ' असा शब्दप्रयोग करतो तेव्हा आईची जी भाषा ती मुलाची भाषा असा अर्थ आपल्याला अभिप्रेत असतो काय ? लहान मुल त्याच्या परिसरातील भाषा आत्मसात करते.ते वाढत जाते , तसा त्याच्या परिसराचा विस्तार होतो आणि त्याचा त्याच्या भाषेवर परिणाम होतो. आमच्या छत्रपती संभाजीनगरला ( औरंगाबाद ) राहणारे लोकं घराबाहेर पडले की अगदी सहज हिंदी बोलतात. आपण ज्या विक्रेत्याकडून भाजी घेत आहोत , तो ग्रामीण भागातून आलेला आपल्यासारखाच मराठी माणूस आहे , याचा जणू विसरच पडतो आणि ' मेथी क्या भाव है ? ' असा प्रश्न हाती भाजीची जुडी घेत सहजपणे विचारतो!प्रश्न भाषेचा असल्याने आणि भाषा ही मूलतः वैयक्तिक असल्याने काही व्यक्तिगत अनुभव नमूद करायला हवेत. साधारण पस्तीस वर्षांपूर्वी पुण्यात राहणाऱ्या मित्राने मला बजावले होते की , पुण्यात रिक्षावाल्याशी हिंदीत बोलायचे नाही ! हिंदीत बोलणारा माणूस पुण्यातील नाही म्हणजे नवखा आहे , असे रिक्षावाल्यांच्या लगेच लक्षात येते आणि मग त्यातील एखादा जवळच्या अंतरासाठी दूरचा रस्ता जवळ करू शकतो असे त्या मित्राचे सांगणे होते.दुसरा अनुभव दिल्लीतील. तेथे राहणारे माझे एक आप्त मला म्हणाले की त्यांच्या परिचयाच्या अन्य मराठी माणसांच्या तुलनेत माझी हिंदी चांगली आहे. या आप्तांना चांगल्या वाटलेल्या माझ्या हिंदीचे कारण माझे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) येथील वास्तव्य म्हणजे माझा परिसर हे आहे.वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांसाठी मार्गदर्शन करणारे प्रा. वसंतराव कुंभोजकर विद्यार्थ्यांना सांगत की , मराठी शब्दोच्चारांवर लक्ष द्यायला हवे. हिंदीत ' ण ' नाही पण मराठीत तो आहे आणि त्याचा उच्चार ' न ' पेक्षा वेगळा आहे ! ही सगळी उदाहरणे भाषेचे परिसराशी असलेले नाते सांगणारी आहेत. कोणतेही व्याकरण शिकण्यापूर्वी भाषा आत्मसात करण्याची मानवी क्षमता नैसर्गिक असल्याचे भाषाशास्त्रज्ञ सांगतात. परिसरात माणसं असतात तशी माध्यमं असतात. आज तर माध्यमांचे प्रकार आणि त्यांची संख्या वाढती आहे.ही सारी माध्यमं आपल्या समोर आणून ठेवणारा मोबाईल आपल्या तर नेहमीच हाती असतो. त्याने आपला जणू सारा परिसरच व्यापला आहे. यातील बराच भाग आभासी असतो आणि तो खऱ्याखुऱ्या परिसरापासून आपल्याला नेहमी दूर नेतो , हेही लक्षात घ्यावे लागते. आपला परिसर माध्यमांनी व्यापलेला असल्याने माध्यमांच्या भाषेचा विचार करावा लागतो.कोणे एकेकाळी ( हा कोणे एकेकाळ फार लांबचा नाही ! ) माध्यमांचे विश्व म्हणजे दैनिके , नियतकालिके , आकाशवाणी आणि दूरदर्शन असे होते. ( आकाशवाणी आणि दूरदर्शन हे शब्द रेडिओ आणि टेलिव्हिजन या शब्दांचे मराठी प्रतिशब्द नव्हेत.पण माध्यमांनी त्या अर्थाने ते रूढ केले आहेत. ' झेरॉक्स ' हा शब्दही असाच रूढ झाला आहे. मागच्या पिढीत वनस्पती तुपासाठी ' डालडा ' हा शब्दही असाच रुढ झाला होता.) जेव्हा माध्यमाचे विश्व मर्यादित होते , तेव्हा त्यांच्यातील स्पर्धाही मर्यादित होती. ( माणसाची झोप ही आमची प्रतिस्पर्धी आहे , असे म्हणणाऱ्या ' नेटफ्लिक्स ' चा काळ तेव्हा कल्पनेतही नव्हता !) एकूण जीवनाला आजच्या सारखी गती नव्हती. ' सर्वात आधी आणि सर्वांच्या पुढे ' हा आजचा जीवनमंत्र तेव्हा माध्यमांनी स्वीकारलेला नव्हता. तेव्हा तंत्रज्ञान आजच्या इतके गतीमान नव्हते आणि त्याच्या गतीची मर्यादा स्वीकारली गेली होती.माध्यमे तंत्रज्ञानप्रधान नव्हती.तेथे काम करणारे आणि वाचक ( ग्राहक नव्हे !) महत्वाचे होते.वाचकांची जडणघडण आपण करू शकतो , ही भूमिका तेव्हा रूढ होती म्हणूनच काही दैनिके राशिभविष्य छापत नव्हती. काही दैनिके आसाम ऐवेजी असम , पंतप्रधान ऐवेजी प्रधानमंत्री , मध्यपूर्व ऐवेजी पश्चिम आशिया , उत्तरपूर्व ऐवेजी इशान्य असे शब्द जाणीवपूर्वक उपयोगात आणत. त्या काळातील भाषा ही बहुतेकवेळा प्रमाणभाषेशी नाते सांगणारी होती. मराठी शब्द कटाक्षाने वापरण्याकडे कल होता.आज एका बाजूला कम्प्युटर हा शब्द वापरला जातो आणि त्याच वेळी डेटा या शब्दासाठी विदा हा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न सुरू असतो आणि यात विसंगती आहे , असे कोणालाही वाटत नाही. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट यांना अनुक्रमे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय हे रूढ झालेले शब्दही वापरले जात नाहीत. काही वेळा मुख्य न्यायाधीश आणि सरन्यायाधीश असा फरक केला जात नाही. दिनांक ऐवजी तारिख , सप्ताह ऐवेजी आठवडा असे सोपे शब्द रुजवण्यासाठी प्रयत्न झाले , याचा आता विसर पडला आहे. हे घडत आहे याची अनेक कारणे आहेत. वर्तमानपत्रांच्या जगात पूर्वी बातमी असो की लेख , ते संपादकीय संस्कार केल्यानंतरच पुढे पाठवले जात. वार्ताहर , मुख्य वार्ताहर ,उपसंपादक , मुख्य उपसंपादक , वृत्तसंपादक...अशा पायऱ्या तेव्हा केवळ नामाभिधानासाठी अस्तित्वात नव्हत्या तर त्यांची स्वतंत्र कार्ये निर्धारित होती.आज ही पदं अस्तित्वात आहेत पण त्यांची दैनंदिन कार्ये बदलेली दिसतात. हा बदल तंत्रज्ञानातील बदलासोबत आला. तंत्रज्ञान गती आणि स्पर्धा घेऊन आले. त्याने माध्यमांचे स्वरूप बदलले. मुद्रितशोधक हद्दपार झाला.बातमीदार असो की लेखक , तोच त्याच्या मजकूराचा अनेकदा उपसंपादक ठरू लागला. जी दैनिके वेगळी जिल्हा पाने देतात , त्या पानांत या स्थितीचे प्रतिबिंब सहज दिसते.याचा परिणाम भाषेवर झाला. काहींनी नव्या पिढीशी नाते जोडायचे म्हणून त्या पिढीच्या भाषेशी नाते जोडण्याचा व्यावहारिक आग्रह धरला.त्याला कधी तात्विक रूप दिले. त्यातून भाषेचे रूप आणखी पालटले. महानगरातील भाषेत जशी इंग्रजी आणि हिंदीची सरमिसळ झालेली असते तशीच भाषा दैनिकातून डोकावू लागली. महानगरात राहणारी नवी पिढी इंग्रजी माध्यमातून शिकते. त्याच पिढीतील प्रतिनिधी आज वेगवेगळ्या माध्यमातून काम करतात. मग वटहुकूम आणि शासन निर्णय , विधेयक आणि कायदा यात फरक केला जात नाही. मराठीत क्रियापदांचे अनेकवचनी रूप असते , आदरार्थी अनेकवचन उपयोगात आणण्याची पद्धत आहे अशा बाबींचा विसर पडतो. कोणतीही भाषा स्थिर असू शकत नाही आणि भाषेने अन्य भाषांमधील शब्द स्वीकारण्यास काही प्रतिबंध असू शकत नाही.पण असे शब्द स्वीकारताना आपल्या मूळ भाषेला रजा देण्याची गरज नाही.बँकेला बँक म्हणावे पण चेक साठी धनादेश हा शब्द सर्वांना समजतो ना ? आपल्या भाषेविषयी मराठी माणूस जागरूक नाही , ही विदारक वस्तुस्थिती आहे. मागे नगरला ( आजचे अहिल्यानगर ) साहित्य संमेलन झाले तेव्हा सुप्रसिद्ध दिग्दर्शक बासू भट्टाचार्य म्हणाले होते की, कलकत्ता शहरात सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ राहायचे असेल तर बंगाली भाषा शिकावीच लागते.पण महाराष्ट्रात तशी परिस्थिती नाही.येथे पिढ्यानपिढ्या राहणारी माणसं मराठी नव्हे तर त्यांची मातृभाषा आणि हिंदी / इंग्रजी बोलत राहू शकतात.राहतात.असे म्हणतात की ही विदारक वस्तुस्थिती ते सांगत होते तेव्हा सभामंडपातील प्रेक्षक टाळ्या वाजवत होतेआपल्याकडील माध्यमात याच अवस्थेचे प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळे अनेकदा माध्यमातून कानी पडणारी किंवा वाचनात येणारी मराठी ही अनेकदा मराठी वळणाची राहिलेली दिसत नाही. त्यातून मग ' धन्यवाद ' मानतो ' / ' मानते ' यासारखे शब्दप्रयोग रूढ होतात. आभार मानले जातात आणि धन्यवाद दिले जातात हे लक्षात घेतले जात नाही. आपल्याकडे दूरचित्रवाणीचा झपाट्याने विस्तार होत असताना एका मान्यवरांनी असे लिहिले होते की , पाश्चात्य देशात ' मुद्रण संस्कृती ' रुजल्यानंतर तेथे टेलिव्हिजन आला. आपल्याकडे मुद्रण संस्कृती रुजण्यापूर्वीच टेलिव्हिजन आला आणि विस्तारत असून त्याचे काही दुष्परिणाम संभवतात.भाषेच्या बाबतीत हे दुष्परिणाम आपण आता अनुभवत आहोत. मुद्रीत माध्यम हे शब्दप्रधान आहे. नभोवाणीचे माध्यम शब्दच आहे. टेलिव्हिजनचे माध्यम कॅमेरा आहे. लिहिले जाणारे शब्द आणि टिपले जाणारे दृश्य यात अंतर असणार हे उघड असले तरी ते माध्यमांचा परस्परांवर परिणाम होऊ नये म्हणून आवर्जून लक्षात घेणे फार आवश्यक आहे. क्रिकेटच्या सामन्याचे दूरचित्रवाणीवरून होणारे थेट प्रक्षेपण , नभोवाणीवरून त्याच सामन्याचे प्रसारित होणारे धावते वर्णन आणि त्याच सामन्याचा दुसऱ्या दिवशी प्रसारित होणारा वृत्तांत यात फरक असणे स्वाभाविक आहे.असाच फरक या तीन माध्यमातून येणाऱ्या अन्य बाबींबद्दल असायला हवा. बोलण्याची भाषा आणि लिहिण्याची भाषा यात असणाऱ्या फरकाची जाणीव ठेवणे ही प्राथमिक गरज आहे.आपल्याकडे जेव्हा एखाद्या महत्वाच्या घडामोडीचे तपशील दूरचित्रवाणी वाहिन्यांवर दाखवले जातात तेव्हा कॅमेरा त्याचे दृश्य टिपण्याचे काम त्याच्या यांत्रिक क्षमतेने आणि वेगाने करीत आहे , मानवी तोंडातून निघणारे शब्द त्याच्याशी स्पर्धा करू शकत नाहीत याचा निवेदकांना / बातमीदारांना विसर पडलेला दिसतो. वर्तमानपत्रातही हे घडत असल्याचे हल्ली अनुभवास येते. तपशिलाच्या पसाऱ्यात नेमकेपणा हरवून जातो.हा माध्यमांचा परस्परांवर होत असलेला परिणाम आहे.असाच परिणाम मांडणीतही होत असल्याचे अनुभवास येते. छोट्या पडद्यावर एकाच वेळी निवेदक / वार्ताहर दिसतो , त्यांचा ज्यांच्याशी संवाद सुरू असतो तेही दिसतात , जे काही दाखवले जात आहे , त्याच्याशी निगडीत शब्दांकन दिसत असते , ' स्क्रोल ' सुरू असतो , कोपऱ्यात तपमान वगैरे दिसत असते.हे सारे रंगीत असते. वर्तमानपत्रातही मांडणीत अनेकदा अशी गर्दी दिसते.तेथे पुरेसे अंतर राखणारी कोरी जागा अर्थपूर्ण ठरते याचा विसर पडत चाललेला आहे. आपल्याकडे वाहिन्या बहुभाषक असणे अपरिहार्य आहे.त्याचेही भाषेवर दुष्परिणाम होत आहेत. हिंदीत ' खुलासा ' हा शब्द ज्या अर्थाने वापरला जातो , त्या अर्थाने तो मराठीत उपयोगात आणला जात नाही. पण हल्ली हा ' खुलासा ' मराठीत ऐकू येत असला तरी तो हिंदीतील आहे , हे लक्षात घ्यावे लागते ! अशी किती तरी उदाहरणे देता येतील. हल्ली लहान मुलं त्यांच्या संभाषणात खूप हिंदी शब्द वापरत असतात.त्याचा उगम ते पाहतात त्या ' कार्टुन शो ' मध्ये आहे. आपल्याकडील लग्नसमारंभातील मराठीपण जसे हळूहळू हरवत आहे , तसेच भाषेचेही होत आहे ! कौटुंबिक नात्यातील मराठी संबोधने बाजूला पडत असून भाऊजी या शब्दाची जागा जिजाजी , मेहुणा या शब्दाची जागा साला या शब्दांनी घेतली आहे. एकेकाळी वर्तमानपत्रांनी परिभाषेत भर घातली.आता व्यवहारात रूढ झालेले मराठी शब्द बाजूला सारून तेथे इंग्रजी / हिंदी शब्दांचा उपयोग सुरू आहे , याचा पदोपदी अनुभव येतो. एकीकडे माध्यमातील नवी पिढी कार्यक्षम आणि तंत्रस्नेही असल्याचा अनुभव येत असतानाच त्यांचा मराठी शब्दसंग्रह मर्यादित होत असल्याचे जाणवते.याचे कारण या पिढीत मराठी साहित्याचे वाचन कमी झाले आहे , हे असावे. इंग्रजी माध्यमातून होणारे शिक्षण , बहुभाषक परिसरात संपर्कासाठी सहजपणे उपयोगात आणली जाणारी हिंदी , माध्यमांना आलेले तंत्रज्ञानप्रधान व्यवसायाचे रूप , उसंत न देणारी वाढती स्पर्धा या आणि अशा काही कारणांमुळे आजच्या माध्यमात दिसणारी भाषा विचित्र रूप धारण करीत आहे. माध्यमांचा समाजमनावर होणारा परिणाम लक्षात घेता माध्यमांकडून उपयोगात आणली जाणारी भाषा महत्वाची ठरते. ती निष्कारण कठीण , बोजड नको तशीच स्वतःचे अस्तित्व सहजपणे विसरणारीही नको.ती पुढे जाणारी , स्वागतशील हवी आणि तिचे नाते तिच्या मुळांशी हवे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

राधाकृष्ण मुळी
निवृत्त संचालक
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय

# कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज!

महाराष्ट्र भूमी ही संतांची अन वीरांची भूमी आहे.या मातीचा गुणधर्म इतका कसदार आहे की या मातीत जन्मलेली माणसं बाणेदार अन पिकाची कणसं दाणेदार निपजतात.या मातीचा इतिहास अन भूगोल दर्जेदार आहे.या मातीत जन्मलेल्या संतांनी फक्त. देशालाच नव्हे तर अखिल विश्वाला दिशा देण्याचे कार्य केलं आहे.याच मातीत जन्मलेल्या वीरांनी दिल्लीच्या तख्ताला धडक मारून येथील घोड्यांना यमुनेचे पाणी पाजले आहे. याच मातीत सर्वधर्मसमभाव जोपासला जातो.

तो काळ होता धामधुमीचा, अनेक परकीय आक्रमकांनी उत्तरेकडून या देशावर आक्रमण करून इथल्या जनतेची लूट करून हाहाकार माजवलेला होता.रयत गांजली अन पिचली होती.याच महाराष्ट्र भूमीमध्ये निजामशाही, आदिलशाही अन मुगलशाही यांच्यात वर्चस्वाच्या लढाया चालू होत्या.इथले मातब्बर अन शूरवीर मराठे या तिन्ही शाह्याची चाकरी करण्यात धन्यता मानत होते.इथल्या मातब्बर शूरवीरांच्या तलवारी गुलाम झालेल्या होत्या अन त्यांच्या तलवारीला स्वकीयांचे रक्त लागलेले होते.

मराठवाड्यात वेरूळचे मातब्बर भोसले घराणे राज्य करत होते.मालोजीराजे भोसले यांना दोन मुले होती एक शहाजी अन दुसरे शरीफजी. शहाजी यांचा विवाह विदर्भातील मराठा सरदार लखुजीराव जाधव यांची कन्या जिजाबाई यांच्याशी झाला होता.जाधवांची कन्या सून म्हणून भोसले घराण्यात आली होती.भोसले अन जाधव ही दोन्ही घराणे शूरवीर होते पण हे देखील कोणत्या ना कोणत्या शाहीची चाकरी करण्यात धन्यता मानत होते.ब-याच वेळा या दोन्ही घराण्यात वैर निर्माण होऊन यांनी एकमेकांचे मुडदे पाडताना जिजाऊंनी उघड्या डोळ्यांनी पाहितले होते. हे चित्र बदललं पाहिजे असं जिजाऊंना मनोमन वाटत होते.

सर्वत्र हाहाकार अन अंधकार माजलेला असतांना किल्ले शिवनेरीवर शहाजी राजे अन जिजाऊंच्या पोटी १९ फेब्रुवारी १६३० रोजी एक तेजस्वी पुत्र जन्माला आला.या दिवशी पृथ्वीवर एक नव्हे तर दोन सूर्य उगवले होते.एक पूर्व दिशेला क्षितिजाच्या गर्भातून तर दुसरा किल्ले शिवनेरी वर जिजाऊंच्या गर्भातून शिवाजी नावाचा सूर्य जन्मास आला होता.

आकाशातील तळपणाऱ्या सूर्याकडे पाहून जिजाऊंच्या गर्भातून जन्माला आलेला सूर्य म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज म्हणाले असतील,तू तिथला सूर्य आहेस तर मी इथला सूर्य आहे,दोघे मिळून एक करार करू जग बदलण्याचा थरार करू,तू त्या ता-यांना प्रकाशमान कर मी या सा-यांना प्रकाशमान करतो!

बाल शिवबांचे संगोपन जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली झाले.त्यांनी बालपणीच शिवबाला समतेची शिकवण दिली.जिजाऊ म्हणजे संस्काराचे विद्यापीठ होत्या.छत्रपती शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत जिजाऊंचा मोठा वाटा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणजे जिजाऊंच्या संस्काराची देणगी आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रात आपल्याला विविध गुणांचे दर्शन होते.आजपर्यंत आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त अफजलखान वध,शाहिस्तेखानाची बोटे तोडणे व औरंगजेबाच्या हातावर तुरी देणे एवढ्या पुरतेच मर्यादित माहित होते.छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणजे एक धगधगते अग्नीकुंड आहे,ज्याच्यातुन निघणा-या ज्वाला समस्त जगताला प्रकाशमान करून एक नवी दिशा देण्याचं कार्य करतात.

आज सुमारे पावणेचारशे वर्ष उलटून गेली असतानाही लोकशाही मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष होतो आहे,छत्रपती शिवाजी महाराज राजे होते आज राजेशाही संपून लोकशाही आली आहे,तरीपण या राजाचा उदोउदो होतो आहे,कारण छत्रपती शिवाजी महाराज हे वंशपरंपरेने राजे बनले नव्हते तर त्यांनी स्वराज्य निर्माण केले होते व ते निर्माण करत असतांना त्यांनी रयतेला विश्वास दिला होता हे राज्य रयतेचे आहे. रायरेश्वराच्या मंदिरात मूठभर मावळ्यांच्या सोबतीने त्यांनी स्वराज्याची शपथ घेतली होती. स्वराज्याच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणारे मावळे त्यांनी निर्माण केले होते.

मुगलशाही, आदिलशाही अन निजामशाही यांच्यासारख्या बलाढ्य शाह्याना टक्कर देऊन स्वराज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आगीमध्ये उडी मारण्यासारखे होते.पण त्यांच्या या कृतीतून आपल्याला प्रेरणा मिळते की मनामध्ये जर दृढविश्वास असेल तर अशक्य असणा-या गोष्टी देखील आपण शक्य करू शकतो हा महत्वाचा संदेश आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून शिकायला मिळतो.स्वराज्य निर्माण करत असतांना रयतेला विश्वासात घेणे ही सर्वात मोठी गोष्ट असते. नेमकी हीच गोष्ट छत्रपती शिवाजी महाराजांनी साधली होती.शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही कुणी हात लावता कामा नये हा फतवा शिवाजी महाराजांचा होता.कृषी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे अन हा कणा मजबूत झाला तर राज्य भक्कम होईल हे शिवाजी महाराजांना माहीत होते.त्यामुळेच त्यांनी कृषी व्यवस्था मजबूत करण्यासाठी शेतक-यांच्या हिताचे कायदे बनवले होते.वर्तमान लोकशाही मध्ये राज्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून एवढा जरी संदेश घेतला तरी देशाचे निम्मे प्रश्न आपोआपच सुटतील.

छत्रपती शिवाजी महाराज धर्मसहिष्णू होते,त्यांना स्वधर्माचा अभिमान होता पण त्यांनी इतर धर्माचा कधीच दुस्वास केलेला आपल्याला दिसत नाही.त्यांच्या सैन्याचा पहिले सेनापती नूरखान बेग होते,आरमाराचा प्रमुख दौलतखान होते,त्यांचा विश्वासू सेवक मदारी मेहतर होता.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कुठल्याही मशिदीवर हमला झालेला आपल्याला दिसून येत नाही. त्यांनी याकूत बाबा यांना आपले गुरू मानले होते.

आपल्याला वर्तमान परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून याच गोष्टी लक्षात घेऊन आपल्या सर्वांना गुण्यागोविंदाने नांदायाचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्त्रिया सुरक्षित होत्या.रांझ्याच्या पाटलाने गरीबांच्या मुलीवर बलात्कार केला तर भर चौकात त्याचे हातपाय कलम केले .स्वराज्याचा सेनापती स्वतःचा सख्खा मेहुणा सकुजी गायकवाड ज्यांनी विजयाच्या उन्मादात सावित्री देसाई नावाच्या महिलेवर अत्याचार केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी या विजयी सेनापतीचे डोळे काढून आजन्म कारावासाची शिक्षा दिली होती.कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची चोळी बांगडी देऊन यथोचित सन्मान केला.छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रांतून स्त्रियांचा सन्मान करायला आपण शिकले पाहिजे.स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करण्याची शिकवण आपल्याला त्यांच्या चरित्रांतून घ्यायची आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेले किल्ले आजही ब-याच अंशी शाबूत असतांना दिसत आहेत,त्यांचे वास्तुशास्त्राचे ज्ञान अगाध होते.त्यांनी आरमाराची स्थापना केली.छत्रपती शिवाजी महाराजांकडे दूरदृष्टी होती.त्यांनी जलदुर्ग बांधले.

संकटाच्या वेळी खचून न जाता आलेल्या प्रसंगला धीरोदात्तपणे तोंड देऊन संकटातून मार्ग शोधण्याचे कसब छत्रपती शिवाजी महाराजांना अवगत होते. अफजलखान वध असेल, पन्हाळ्याचा वेढा असेल,मिर्झाराजे जयसिंग यांच्याशी केलेला तह असेल वा आग्र्याहून करून घेतलेली सुटका असेल असे कितीतरी बाके प्रसंग महाराजांच्या जीवनात आले,पण या सर्व प्रसंगांना घाबरून न जाता त्यातून मार्ग काढून ते सहीसलामत बाहेर पडले.या सर्व प्रसंगातून आपल्याला हे शिकायला मिळते की छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र हे डोक्यावर घेऊन मिरवायचे नसून ते डोक्यात घेऊन अंमलबजावणी करायचे आहे हे समजून घेणं गरजेचं आहे.

पन्हाळ्याच्या वेढ्यात शिवा काशीद ,घोडखिंडीत बाजीप्रभू देशपांडे, पुरंदरावर मुरारबाजी, कोंढण्यावर तानाजी मालुसरे,आग्र्याच्या वेढ्यात हिरोजी फर्जंद,मदारी मेहत्तर सारखी माणसं मरणाला कवटाळण्यास तयार का झाली ? याच्या पाठीमागचे कारण शोधण्याची गरज आहे.कारण या सर्वांना माहीत होतं छत्रपती शिवाजी महाराजांनी आरंभलेलं कार्य हे सामान्य रयतेसाठी आहे,लाख मेले तरी चालतील पण लाखोंचा पोशिंदा मात्र जगला पाहिजे यासाठी ही माणसं हसत हसत मरणाला कवटाळण्यास तयार झाली.महाराजांनी त्यांना कुठल्या वतनाचे वा जहागीरीचे आमिष दाखवले नव्हते.हा निस्वार्थीपणा आपल्याला शिव चरित्रांतून घ्यायचा आहे.माणसं जोडण्याची अन जोडलेली माणसं शेवटपर्यंत टिकवून ठेवण्याचं कसब छत्रपती शिवाजी महाराजांना अवगत होतं.

खुळ्या समजुती अन अंधश्रद्धा यांना त्यांनी कधीच थारा दिला नव्हता.धाकटे युवराज चिरंजीव राजाराम जेंव्हा पालथे जन्माला आले तेंव्हा पुरोहितांनी त्यांना हे अशुभ आहे असे सांगितले पण महाराजांनी त्यांना निक्षून सांगितले राजाराम पालथे जन्माला आले म्हणजे ते तिनी शाह्यांना पालथे घालणार आहेत.त्यांनी जातीपातीची बंधने झुगारून दिली होती.महत्वाच्या पदावर त्यांना नेमणुका दिल्या होत्या.बहिर्जी नाईक यांच्यासारख्या व्यक्तीवर त्यांनी हेरखात्याच्या प्रमुख पदाची जबाबदारी दिली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी पाटीलकी अन कुळकर्णी ही वतनं बरखास्त करून पगारी नोकर नेमले होते. स्वतःचा राज्याभिषेक करून घेऊन त्यांनी रयतेच्या कारभाराची घडी नीट बसवण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली.मंत्र्यांना कामे नेमून दिली अन दिलेली कामे व्यवस्थित पार पाडली जात आहेत किंवा नाही याची खातरजमा करून घेत असत .त्यांच्या राज्यात लाचखोरी अन नफेखोरी यांना थारा नव्हता. अपराध्याला कडक शासन केले जात असे.एकंदरीतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात राज्यकारभाराची घडी व्यवस्थित बसलेली होती.

धर्माच्या बाबतीत छत्रपती शिवाजी महाराजांनी उदार धोरण अवलंबलेलं होतं. मुसलमान झालेल्या बजाजी निंबाळकर व नेताजी पालकर यांना त्यावेळच्या धर्ममार्तंडाचा विरोध झुगारून परत स्वधर्मात घेतले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी युद्धतंत्राची जगातील अनेक योध्यानी दखल घेतली आहे .

छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील सर्वच पैलू आपल्याला जीवनात पदोपदी उपयोगी पडतात. भारत देशातील सर्वच लोकांनी त्यांच्या चरित्राचा जीवनात अंगीकार करणे गरजेचं आहे.राज्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार नजरेसमोर ठेवून राज्य करण्याची गरज निर्माण झाली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र कालही श्रेष्ठ होते आजही आहे अन उद्याही श्रेष्ठच राहणार आहे.

चला तर आपण शपथ घेऊ आपण उतणार नाहीत मातणार नाहीत शिवचरित्रातून घेतलेला वसा सोडणार नाहीत!

जगाच्या पाठीवर ज्या व्यक्तिमत्वाचे चरित्र अन चारित्र्य स्वच्छ अन निखळ आहे अश्या कुळवाडी भूषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांना माझा मानाचा मुजरा!.

सर्वांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!

जय जिजाऊ
जय शिवराय!

प्रा.पंजाबराव येडे
जिल्हा सचिव मराठा सेवा संघ
बीड
मोबा.नं.९४०४१०१४८३



# शिवरायांची आरती नको जिजाऊ वंदनाच व्हावी

## शिवरायांचे दैवतीकरण थांबवण्यासाठी शिवप्रेमींनी पुढाकार घ्यावा

छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त नाव नाही तर येणाऱ्या पिढ्यांसाठी चंद्र सूर्य आहे तोपर्यंत पुरेल आणि तरीही उरेल अशी अक्षय ऊर्जा आहे. अशी विवेकी, विचारी, सृजनशील व्यक्तिमत्व जन्माला यायला, घडायला अनेक पिढ्या, अनेक युगे जावी लागतात. त्यामुळेच ते युगप्रवर्तक युगपुरुष ठरतात. त्यांचे विचार आणि कर्तृत्व व्यक्तीपासून विश्वापर्यंत सर्वांसाठीच दीपस्तंभासम दिशादर्शक, मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे. जीवनात लढण्यासाठीचं, झुंजण्यासाठीचं, बळ, प्रेरणा, ऊर्जा ही शिवचरित्रातून मिळते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कर्तृत्व, नेतृत्व, वक्तृत्व, दातृत्व, मातृत्व, त्यांचे बुद्धीचातुर्य, मुत्सद्दीपणा, शौर्य, धाडस या सर्व गुणांनी त्याचबरोबर न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता, सर्वधर्मसमभाव, स्त्री-पुरुष समानता या सर्व मूल्यांनी ते इतिहासात मानवी आदर्शांचा सर्वोच्च मानबिंदू बनलेले आहेत. छत्रपती शिवराय मानवतावादी योद्धा, आदर्श शासक, प्रशासक होते त्याबरोबरच मानसशास्त्र, अर्थशास्त्र, शेती, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, पर्यावरण, राजकारण, भाषा, धर्म, संस्कृती यांचे जाणकार होते. धर्मसत्तेपेक्षा राजसत्ता श्रेष्ठ असते असे ठणकावून सांगणारे जगातील पहिले राजे होते. त्यांचा अद्वितीय पराक्रम, आदर्श राज्यकारभार, तळागाळातील गोरगरीब रयतेच्या हिताचा विचार, शेतकरी - कष्टकरी - स्त्रियांचा सन्मान, अन्याय-अत्याचार, जुलूम-जबरदस्ती करणाऱ्यांना कडक शासन, जहागीरदार - वतनदार - जमीनदार - कुलकर्णी - पाटील - देशपांडे यांना वठणीवर आणण्यासाठी अवलंबिलेले कडक धोरण. हे राज्य रयतेचे आहे, रयतेसाठी आहे असा लोकांना दिलेला विश्वास, स्वच्छ - निष्कलंक - पारदर्शी आणि रयताभिमुख आचरण यामुळे ते रयतेमध्ये लोकप्रिय झाले. त्यांनी इथल्या रयतेच्या काळजात घर केले. महाराज आधी कोट्यावधी लोकांच्या हृदय सिंहासनावर विराजमान झाले आणि मग नंतर ०६ जून १६७४ ला दुर्गराज रायगडावर ३२ मण सोन्याच्या सिंहासनावर विराजमान झाले.

असं म्हटलं जातं की विजेते वेगळ्या गोष्टी करत नाहीत तर ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात. जगातल्या इतर राजांनी जे केलं ते शिवरायांनी कधीच केलं नाही आणि जे शिवरायांनी केलं ते जगात कोणाच्या बापाला जमलं नाही. ज्या काळात युरोपातील राष्ट्रात जनता राजांना पदच्युत करत होती, ठेचून मारत होती त्याच काळात भारतातली, महाराष्ट्रातली शेतकरी - कष्टकरी गोरगरीब रयत शिवरायांना राजा बनवण्यासाठी प्राण तळहातावर घेऊन लढत होती. हे शिवरायांचे वेगळेपण आहे त्यामुळेच आजही जगभरातील लोकांना शिवराय अभ्यासावे वाटतात. कारण आजही वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय व जागतिक जीवनामध्ये काही गुंतागुंत वा समस्या निर्माण झाली तर त्या समस्येचे उत्तर शिवचरित्रात सापडते आणि भविष्यातही सापडणार आहे. संकट कितीही मोठे येऊ द्या, परिस्थिती कितीही प्रतिकूल असू द्या, त्याला कसं सामोर जायचं हे शिवचरित्र शिकवतं. खचू नका, निराश होऊ नका, आणि संकटापासून दूर पळू नका, संकटाला भिडा, लढा, जिंका कारण लढणं, संकटाला भिडणं हेच खऱ्या विराचं जगणं आहे हा जीवनाचा मंत्र शिवचरित्रातून मिळतो. आधुनिक जगाच्या इतिहासातील मानवाने मिळवलेलं पहिलं स्वातंत्र्य आणि जगातील पहिलं लोकशाही राज्य म्हणजे शिवरायांचं स्वराज्य अशी नोंद सुवर्णाक्षरांनी जगाच्या इतिहासात झाली आहे. साडेतीनशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी अहद तंजावर तहद पेशावर माझेच राज्य असेल म्हणजे त्या काळच्या संपूर्ण भारतावर राज्य करण्याचे स्वप्न पाहिलं. त्यांची हीच प्रेरणा येणाऱ्या पिढ्यांना जगावर राज्य करण्याचं बळ देईल. त्यांच्या आदर्शांपासून प्रेरणा घेऊन आजतागायत भारतात आणि जगभरात अनेकांनी इतिहास घडवला आहे. अशा उत्तुंग व्यक्तिमत्वाचे दैवतीकरण करून ते निष्प्रभ करण्याचे षडयंत्र या महाराष्ट्रात रचले जात आहे हे दुर्दैवी आहे.

विश्ववंदनीय शिवरायांना देवत्वाच्या फ्रेममध्ये बंद करून, मंदिरात बंद करून, त्यांचा अभिषेक व आरती करून, त्यांना शिवशंकराचा अवतार दाखवून त्यांच्या विचारांची कर्तृत्वाची माती करण्याचं षडयंत्र काही शिवद्वेष्टे जाणीवपूर्वक करत आहेत. ते रोखणं हे सच्चा शिवप्रेमींसमोरचं मोठं आव्हान आहे. छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे मानव कुळात, मानवाच्या पोटी जन्माला आलेला हाडामासाचा खरा खुरा माणूस. त्यांचं कर्तृत्व हे मानवी कर्तृत्व. त्यांना जर देवत्व बहाल केलं आणि मंदिरात बंद केलं तर आमच्या येणाऱ्या पिढ्यांचं फार मोठं नुकसान होणार आहे. कारण एकदा का दैवतीकरण झालं की त्या ऐतिहासिक व्यक्तिमत्वाचे विचार आणि कर्तृत्व मागे पडते. आरती, अभिषेक, मंदिरे देवाची असतात कर्तुत्ववान माणसांची नव्हे. छत्रपती शिवाजी महाराज मानवी मूल्य जपणारे आदर्श मानव होते. ते देवा पेक्षा कमी नव्हते पण देव मात्र निश्चितच नव्हते. मानवी कर्तुत्वाला दैवी पाठिंबा हवाच परंतु दैवी आवरणाखाली मानवी कर्तृत्व झाकले जाऊ नये याचीही काळजी घेतली पाहिजे. शिवराय देवाला मानत होते. देवावर त्यांची प्रचंड श्रद्धा होती. तुळजापूर निवासिनी तुळजाभवानी, शिखर शिंगणापूरचे शंभू महादेव ही छत्रपती शिवाजी महाराजांची कुलदैवतं होती, श्रद्धास्थानं होती. महाराजांच्या किल्ल्यांवर या दोन दैवतांची मंदिरे महाराजांनी बांधली होती याचे आजही पुरावे आहेत. त्यांच्या सैन्याचे घोषवाक्य हर हर महादेव तर महाराजांच्या मुखामध्ये सतत जगदंब हे नाव आणि गळ्यात कवड्याची माळ होती. राजे श्रद्धाळू होते पण अंधश्रद्धाळू नव्हते. राजे धार्मिक होते पण धर्मांध नव्हते. शिवराय देवाला मानत होते पण देववादी वा दैववादी नव्हते तर प्रयत्नवादी होते. देव आणि धर्मापेक्षा देश मोठा आणि महत्त्वाचा असतो असे मानणारे होते. जगातल्या एकाही देवाच्या मंदिरात आणि जगातल्या एकाही धर्मात आजही सर्वांना समान संधी, समान दर्जा, समान प्रवेश नाही पण शिवरायांच्या दरबारात कसलाच भेद नव्हता. म्हणून ते देवांपेक्षाही महान ठरतात. आपण देवाला मानतो. देवांवर आपली श्रद्धा आहे. आपल्याकडे देवांची, देवांच्या नावाने चालणाऱ्या सण उत्सवांची, यात्रा जत्रांची संख्या कमी नाही. आपण ते सगळं आनंदाने आणि अभिमानाने करतो. आपल्या आदर्श परंपरा जपतो. आपली भावना, संस्कृती, श्रद्धा जपण्यासाठी ते पुरेसं आहे. आणखी देवांची संख्या वाढवण्याची गरज नाही.शिवरायांना जर देवत्व बहाल केलं तर आमच्या डोळ्यासमोर सर्वोच्च मानवी आदर्श राहणार नाहीत परिणामी येणाऱ्या पिढ्या कर्तृत्वशून्य होतील. शिवरायांचे विचार व कार्य नसानसात भिनायला हवे तेव्हा कुठे अंगावर येणारी वादळ थोपवता येतील. आज मंदिरे, आरती, अभिषेक होईल, उद्या नारळ फोडले जातील, नवस - सायास, उपास - तापास केले जातील, नंतर शिवराय अंगात येतील, अंगारे - धूपारे, गंडे - दोरे सुरू होतील, मग चमत्कार सांगितले जातील, भाकडकथा - पुराणकथा - मीथकं तयार केली जातील, त्यांच्या नावाने भोंदूगिरी सुरू होईल, म्हणजे काय तर कर्तुत्वाला चमत्कार समजून एका कर्तृत्ववान महापुरुषाच्या कर्तुत्वावर पाणी फेरलं जाईल. आजपर्यंत ही हे झालेलच आहे, शिवरायांना भवानी माता प्रसन्न होती, भवानी मातेने तलवार दिली त्यामुळेच शिवराय एवढा पराक्रम गाजवू शकले, अशाही वावड्या उडवल्या जातातच की. म्हणजे शिवरायांनी आपल्या आयुष्याचं धगधगतं अग्नीकुंड केलं, जीवघेणा संघर्ष केला, कष्ट उपसले, जीवावरच्या जोखीमा पत्करल्या याला काहीच किंमत उरत नाही. त्यांचे शौर्य, धाडस त्यांच्यात असलेल्या दैवी सामर्थ्यामुळेच होते असे भासवले जाते. असा जाणीवपूर्वक प्रचार केला जातो यापेक्षा शिवरायांचा दुसरा मोठा अपमान कुठला असू शकतो. त्यांच्या पराक्रमाचे श्रेय देवाला दिल्याने जागतिक इतिहासातही त्यांना स्थान मिळणार नाही कारण अवतार फक्त भारतात चालतात जगात चालत नाहीत. त्याचबरोबर अवतार ही संकल्पना इतिहासाच्या दृष्टिकोनातून वास्तव स्वरूपात टिकत नाही हे हजारो पुराव्यांनिशी सिद्ध झालेलं आहे. शिवरायांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचं रणकंदन केलं तेव्हा कुठे शिवभारत घडलं. ज्यामध्ये रामायण आणि महाभारतातील आदर्श मूल्यांचे प्रतिबिंब दिसते ते शिवभारत. शिवरायांच्या कर्तृत्वाला देवत्वाच्या फ्रेम मध्ये बंद करून त्यांच्या इतिहासाचा जनमानसातील प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होत आहे. शिवरायांना मंदिराच्या गाभाऱ्यात बसवून, त्यांची आरती आणि अभिषेक करून ज्या समाजासाठी शिवराय जगले, लढले, झुंजले, आयुष्यभर निकराचा लढा दिला, पुढे चालून त्याच समाजाला देवाच्या, धर्माच्या, कर्मकांडाच्या मार्गाने नेलं जाईल व समाजाचं मानसिक, शारीरिक, आर्थिक, सामाजिक शोषण केलं जाईल. त्यामुळे हे दैवतीकरण थांबणं गरजेचं आहे देव आणि मानव या पूर्णपणे भिन्न बाबी आहेत त्यामुळे देवाने जे केलं ते मानव कधीच करण्याच्या भानगडीत पडत नाही. समजा आपल्याला कोणी सांगितले हनुमानाप्रमाणे उड्डाण करा आणि पर्वत उचलू आणा किंवा रामकृष्णा प्रमाणे एखादी गोष्ट करा तर आपले उत्तर काय असेल अरे तो हनुमान देव आहे रामकृष्णही देव आहेत मग आपल्याला देवासारखे करायला कसे जमेल आपण फक्त त्यांची मंदिरे बांधायची, पूजा करायची, आरती करायची, प्रसाद खायचा आणि हात पुसून मोकळं व्हायचं. कारण आपल्याकडे दैवी शक्ती नाही त्यामुळे आपण देवासारखे वागण्याचा प्रयत्न करायचा नसतो अशीच सार्वत्रिक मानसिकता असते. शिवरायांच्या इतिहासाचे जे दुश्मन आहेत त्यांना हेच घडवायचं आहे. शिवरायांच्या हयाती पासून आजतागायत अनेकांनी अनेक वेळा अनेक मार्गाने त्यांचे कर्तुत्व खुजे करण्याचा, झाकोळण्याचा प्रयत्न केला आहे आणि आजही सुरू आहे. पूर्वग्रह दूषित भावनेतून लिहिलेल्या इतिहासातून, कथा, कादंबऱ्या, चित्रपट, मालिका, नाटक इत्यादिंमधून शहाजीराजे, जिजाऊ, शिवराय, शंभूराजे आणि एकूणच त्यांच्या परिवारातील व्यक्तींच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले, बदनामी केली, चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. पण ही सगळी व्यक्तिमत्व एवढी प्रभावी होती की सगळ्यांना पुरून उरली. आजपर्यंतचे बदनामी करण्याचे वारंवार केलेले सर्वच प्रयत्न निष्फळ ठरले मग आता दैवतीकरण करायचे आणि त्यांची प्रेरणा नष्ट करायची. त्यांनी जे केलं ते देव होते म्हणून त्यांना जमलं आपण मानव आहोत आपल्याला कसे जमेल ही मानसिकता एकदा का रूढ झाली तर मग शिवकार्य कसे साधणार ? हे जर नाही थांबवलं तर महाराज फक्त आणि फक्त देवळातील व घराच्या देवघरातील देव बनून शिल्लक राहतील हे मात्र निश्चित. इतिहास हा वस्तुनिष्ठ असावा लागतो. घडलेल्या घटनांवरून तो जसा घडला तसा लिहावा लागतो. अंदाज, कल्पना, भावना, श्रद्धा, कोणाची मते - मतांतरे याला त्यात स्थान नसते. कारण इतिहासाला सबळ पुरावे लागतात सत्य इतिहास जपणं आणि वेगवेगळ्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवणं महत्त्वाचं असतं पण छत्रपती शिवाजी महाराजांचे दैवतीकरण करून दुष्टकावा साधल्या जातोय. तेंव्हा शिवप्रेमींनी छत्रपती शिवरायांना अवताराकडे, चमत्काराकडे, देवत्वाकडे नेण्याच्या या कपटनितीचा धोका ओळखून सावध असले पाहिजे. आरतीपेक्षा लाख पटीने जिजाऊ वंदना चांगली आहे ती जनमानसात, मनामनात, घराघरात, राज्यभरात, देशभरात आणि जगभरात पोहोचली आहे, रुजली आहे, लोकांनी स्वीकारले आहे. लाखोंचे मराठा क्रांती मोर्चे असोत किंवा मनोज जरांगे पाटलांच्या रेकॉर्ड ब्रेक सभा असोत या सर्वांची सांगता वा सुरुवात जिजाऊ वंदनेने झाली हे सर्व चांगले घडत असताना जिजाऊ वंदनेला पर्याय म्हणून जाणीवपूर्वक आरती पुढे आणली गेली.ज्या जिजाऊंनी उदरात बाळ आणि उरात महाराष्ट्राची काळजी वाहिली. ज्यांनी चारशे वर्षांपूर्वी आमचा कोंडलेला श्वास मोकळा केला. ज्या काळात मराठी मातीत सर्वत्र मुर्दाड आणि निसत्व वातावरण निर्माण झालं होतं. पारतंत्र्य आणि गुलामी बद्दल कोणाला तिटकारा वाटत नव्हता. स्वातंत्र्य गमावल्याबद्दल खेद वाटत नव्हता. भूमिपुत्रांना मुस्कटदाबी मुकाट्याने सहन करावी लागत होती. आसमानी आणि सुलतानीला तोंड देता देता रयत पिचली होती. दैववादी बनून आजचं मरण उद्यावर ढकलत होती. अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड यांनी अक्षरशः हैदोस घातला होता. स्त्रियांना गुलामीचं जीनं बहाल केलं गेलं होतं. माणसा माणसात जातीभेदाच्या भिंती निर्माण केल्या गेल्या होत्या. समाजाने क्षत्रियत्वाच्या विचारांकडे पाठ फिरवली होती. समाज बलहीन, सत्वहीन आणि तेजोहीन बनला होता. अशा परिस्थितीत जिजाऊंनी प्रयत्नवादी विचारांची पेरणी केली. रयतेच्या गमावलेल्या स्वत्वाला फुंकर घातली. निखाऱ्यांवर साचलेली काजळी दूर केली. त्यांच्यातील स्वाभिमान जागा केला. त्यांना क्षात्रबाण्याची शिकवण दिली. शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभा केलं. आणि या मातीमध्ये शेतकऱ्यांचं, कष्टकऱ्यांचं, मायमाऊल्यांचं, अठरापगड जाती धर्मातील रयतेचं राज्य निर्माण केलं. इथली रयत सुखी केली. अत्याचार, शोषण करणाऱ्या, लुटणाऱ्या जुलमी सत्ता उध्वस्त केल्या. या मातीत स्वराज्य, सुराज्य निर्माण केलं. या मातीसाठी आणि मातीच्या स्वाभिमान अन् अभिमानासाठी, स्वराज्यासाठी, रयतेच्या राज्यासाठी स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना घडवणाऱ्या राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांना जिजाऊ वंदनेच्या माध्यमातून वंदन करणे निश्चितच चांगले राहील. एका राजाच्या कुटुंबात जन्माला येऊन दुसऱ्या राजाशी विवाह करून मुलाला जन्म देऊन राजमाता होणं वेगळं आणि एका सरदाराच्या कुटुंबात जन्माला येऊन दुसऱ्या सरदाराशी विवाह करून मुलाला जन्म देऊन ज्यांनी शून्यातून विश्व निर्माण करणारा राजा घडवला, स्वराज्य निर्मितीच्या लढ्याचे सारथ्य करून आपल्या मुलाला ३२ मण सोन्याच्या सिंहासनापर्यंत पोहोचवणाऱ्या छत्रपती बनवणाऱ्या जिजाऊंचे कार्य अद्वितीय आणि प्रेरणादायी आहे. रयतेचं राज्य निर्माण व्हावं, रयतेचा संसार सुखाचा व्हावा म्हणून जिजाऊंनी आपल्या संसाराची वाटणी केली. पोटच्या पोरांची वाटणी केली. आपल्या सांसारिक जीवनाची बावीस वर्ष जिजाऊंनी फक्त आठवणींवर काढली या त्यागाचे मोल करता येणार नाही. जिजाऊ शिवराय शंभूराजांनी त्याग केला नसता, ते झिजले नसते तर हे सोहळे सजले नसते. पुढे हे सोहळे वर्षानुवर्ष सजवायचे असतील तर इतिहास जपला पाहिजे आणि त्यासाठी आरती ऐवजी जिजाऊ वंदना झाली पाहिजे.प्रबोधनकार ठाकरे म्हणतात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावात इतकी ताकद आहे, इतकी ताकद आहे की नुसतं जय शिवराय जरी म्हटलं तरी तेहतीस कोटी देवांची फलटण बाद होते. एवढं महान कर्तृत्व असलेल्या आपल्या राजाचे दैवतीकरण रोखणं ही शिवप्रेमी म्हणून आपली सर्वांची जबाबदारी आहे.कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात एक वर्षाची सोय लावायची असेल तर धान्य पेरा, दहा वर्षांची सोय लावायची असेल तर झाडे लावा, शंभर वर्षांची सोय लावायची असेल तर माणसे पेरा पण हजारो वर्षांची सोय लावायची असेल तर विचार पेरा. येणाऱ्या पिढ्या अंधश्रद्धाळू असू नयेत, धर्मांध असू नयेत, राष्ट्रीय वृत्तीच्या नीपजाव्यात, बलदंड दंडाच्या, निधड्या छातीच्या, पोलादी मन आणि मनगटाच्या, सुपीक डोक्याच्या, सर्वांगीण विकसित बुद्धीच्या असाव्यात असे वाटत असेल तर शिवरायांचा सत्य विचार रुजवला पाहिजे. पुढील हजारो लाखो वर्ष तो विचार टिकला पाहिजे.जिजाऊ वंदना म्हणताना शिवपार्वती, शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा राजा संविभागी बळीराजा, स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले, स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज व सर्व महामानवांना वंदन होते. भयमुक्त, गुलामी मुक्त, दुःख - दैन्य मुक्त समाज निर्माण करण्याचा विचार



जिजाऊ वंदनेत आहे. कसलिच आणि कुठलीच बंधने कोणावर नाहीत तर सर्वांना प्रगतीसाठी दहा दिशा मुक्त असून सर्व दिशांनी प्रगती करण्याचे स्वातंत्र्य आहे. या सर्वांवरून जिजाऊ वंदना प्रेरक आणि मार्गदर्शक ठरते. अंधाराकडून प्रकाशाकडे नेते, शिवरायांच्या सत्य धर्माकडे नेते. मागे एकदा कोल्हापूरच्या गादीचे वंशज युवराज छत्रपती संभाजी महाराज यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती, ते म्हणाले होते की छत्रपती शिवाजी महाराज आमच्यासाठी दैवतच आहेत पण अभिषेक आरती करून त्यांचे दैवतीकरण करणे आम्हाला मान्य नाही.

शेवटी चंद्र सूर्य ही जातील पण छत्रपतींचे विचार आणि कर्तुत्व चिरंतन राहील. ते जपणं आपलं सर्वांचं कर्तव्य आहे आणि जबाबदारीही. भावनेच्या भरात दैवी संकल्पनेच्या दृष्टिकोनातून शिवरायांना पाहणे आपल्याला थांबवावे लागेल. भविष्यात येणाऱ्या पिढ्यांना आपण कोणते शिवराय देणार आहोत यावर विचार करावा लागेल. त्यामुळे सण, उत्सव, लग्न - समारंभ, घरातील कार्यक्रम वा जयंती, स्मृतिदिन असा कोणताही प्रसंग असो त्याची सुरुवात वा सांगता जिजाऊ वंदनेनेच व्हावी म्हणून प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिवप्रेमी म्हणून आपण सर्व मिळून एकजीवाने हे महतकार्य करूयात आणि आपला इतिहास जपुयात.

जय जिजाऊ जय शिवराय
ह.भ.प.संतोष महाराज डोंगरे
जिल्हाध्यक्ष

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १९ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


# धनगरवाडी येथे शिवजयंती निमित्त प्रा रविराज पोकळे यांचे व्याख्यान



आष्टी तालुक्यातील धनगरवाडी (डो)येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाची १९ फेब्रुवारी या दिवशी पर्वणी आहे धनगरवाडी या छोट्याशा गावामध्ये गेल्या दहा वर्षापासून शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो याही वर्षी कार्यक्रमाचे जय्यत तयारी सुरू आहे त्या निमित्ताने १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता गावामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा सायंकाळी ५ ते ६ या वेळेत शिवश्री अनिल सकुंडे व शिवश्री संजय सकुंडे यांच्याकडून भोजन व्यवस्था सर्व शिवभक्तांना आहे त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगरवाडी येथील शालेय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम!६:३० ते ८:३० या वेळेत आहे रात्री ९ वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिवचरित्रकार रविराज पोकळे सर यांच्या शिवजयंती पर व्याख्यान आहे तरी पंचक्रोशितील सर्व शिवभक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक शिवजन्मोत्सव धनगरवाडी यांच्या वतीने करण्यात येत आह

# कॉम्प्रमाईजचा आपल्या डिक्शनरीत शब्दच नाही : खा.सुप्रिया सुळे



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज मंगळवारी (दि.१८) मस्साजोग येथे भेट देऊन देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले. तर यावेळी बोलताना मी कोणालाही कुठे भेटणार नाही, कॉम्प्रोमाईजचा तर विषयच नाही, अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी भाजप आमदार सुरेश यांना धनंजय मुंडेंच्या भेटीवरून टोला लगावला आहे. तसेच यावेळी त्यांनी अमित शाह यांची देशमुख हत्या प्रकरणी भेटीची माहिती दिली. तर त्यांनीही या प्रकरणी मी जातीने लक्ष घालणार असल्याचा शब्द दिला असल्याचे म्हटले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला दोन महिन्यांचा कालावधी झाला आहे. मात्र, अद्यापही देशमुख कुटुंबीय न्यायाच्या प्रतिक्षेत आहे. कृष्णा आंधळे हा आरोपी अजूनही पोलिसांना सापडला नाही. भाजप आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरले होते. त्यांनी आकाचे आका म्हणत धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड आरोपही केले होते.

# मराठा सेवा संघाचे मराठा भूषण पुरस्कार जाहीर!

(बीड प्रतिनिधी) मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षीही शिवजन्मोत्सव सोहळा दि. २१/२/२०२५ वार शुक्रवार रोजी ठीक सायं. ७ वा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी संपन्न होत आहे.कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत समाजातील तळागाळातील व्यक्तीसाठी योगदान देणा-या समाज रत्नांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.



शिवजन्मोत्सव सोहळ्यात मराठा भूषण पुरस्काराने सामाजिक व उद्योग क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे रमेश भाऊ पोकळे तर



वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. शरद शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते मराठा समाजभूषण पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे.

यावेळी प्रसिद्ध विचारवंत ज्ञानेश महाराव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे उद्घघाटक बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिवश्री अशोक थोरात साहेब तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवश्री डॉ. ज्ञानेश मोकाटे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड हे असून प्रमुख उपस्थिती मध्ये शिवश्री एल.पी.गळगुंडे जिल्हा कोषागार अधिकारी बीड,शिवश्री चंद्रकांत शेळके तहसीलदार बीड,शिवश्री प्रवीणकुमार वानखेडे गटविकास अधिकारी बीड,शिवश्री अशोक ठाकरे विभागीय अध्यक्ष मराठा सेवा संघ यांची उपस्थिती राहणार आहे.या सर्व मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये शिवश्री रमेश पोकळे,शिवश्री डॉ शरद शिंदे यांना मराठा समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तरी सर्व शिवप्रेमींनी शिवजन्मोत्सव व मराठाभूषण पुरस्कार सोहळयास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन मराठा सेवा संघ बीड,संभाजी ब्रिगेड व अंतर्गत सर्व कक्षाच्या वतीने करण्यात येते.

# केज तालुक्यातील कोटी येथील नदीचे रुंदीकरण

तालुक्यातील कोटी-लव्हरी येथील नदीचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले. यामुळे या गावाची पाण्याची समस्या सुटणार असल्याने आनंद साजरा करण्यात येत आहे. गावाला दुष्काळ मुक्त करण्यासाठी क्सीस बँकेच्या पुढाकारातून क्शन फॉर रुरल टेक्नॉलॉजी, यवतमाळ या संस्थेच्या माध्यमातून गुरुवारी दि. १६ केज तालुक्यामध्ये कोटी या गावातील नदी रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले. यावेळी समस्त गावकरी व बचत गटातील महिला, उपसरपंच बाप्पा डोंगरे, राजेश डोंगरे बाळू येळवे बाळासाहेब डोंगरे परमेश्वर डोंगरे नवनाथ येळवे , श्रीमंत डोंगरे रामराजे डोंगरे अशोक डोंगरे संतोष कोकाटे मधुकर डोंगरे जनक डोंगरे किसन डोंगरे.... गटातील महिलांची नावे रोहिणी डोंगरे .सोनी शिनगारे. पूजा कोकाटे. नंदू कोकाटे. स्वाती डोंगरे .आशा तपसे .रेखा डोंगरे .संगीता डोंगरे .उल्का डोंगरे .सुनिता डोंगरे .कोमल शिनगारे. उषा डोंगरे. अंजली डोंगरे आदी उपस्थित होते

# डिजिटल मीडिया परिषदेची अंबाजोगाई तालुका कार्यकारणी जाहिर



अंचाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा एस एम देशमुख सर यांच्या नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिलजी वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषद तालुका अंबाजोगाईची कार्यकारणी डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी जाहीर केली आहे. डिजिटल मीडिया परिषद तालुका अंबाजोगाई च्या अध्यक्षपदी संग्राम महाराष्ट्राचा न्यूज चे संपादक अभिजीत लोमटे, कार्याध्यक्ष अंबाजोगाई दर्शन न्युज चे संपादक सतीश मोरे, उपाध्यक्ष न्यूज लोकमन संपादक संजय जोगदंड, उर्दू न्यूज चैनल संपादक आरेफ सिद्दिकी, ए एम न्यूज संपादक अमोल माने (ग्रामीण), सचिवपदी सरकार एक्सप्रेस न्यूज चैनल प्रतिनिधी मोहम्मद फैजान, सहसचिव सचिन मोरे, तालुका संघटकपदी योगेश्वरी न्यूज चॅनलच्या संपादक नागेश अवताडे, युवाशक्ती न्यूज प्रतिनिधी सय्यद नईम, कोषाध्यक्ष एन टीव्ही न्यूज प्रतिनिधी मनोज कोकणे, सहकोषाध्यक्ष जंग न्यूज प्रतिनिधी अहमद पठाण, कार्यक्रम प्रमुखपदी गोल्डन मीडिया न्यूज चॅनलचे गजानन चौधरी( वांगीकर ), प्रसिद्धी प्रमुख सूर्योदय न्यूज चॅनलचे बालाजी देशमुख, योगेश डाके यांची नूतन कार्यकारणी मध्ये निवड करण्यात आली आहे

# शिवजन्मोत्सवानिमीत्त मॅरेथॉन स्पर्धेस उत्स्फुर्त प्रतिसाद

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व ईतर कक्ष आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती नांदेड च्या वतीने नवा मोंढा नांदेड येथे मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली होती त्या स्पर्धेस युवक व युवतींचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.



नवा मोंढा नांदेड येथे मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड,जिजाऊ ब्रिगेड व ईतर कक्षाच्या वतीने गतवर्षी प्रमाणे याही वर्षी दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली.प्रथम राष्ट्रमाता जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले जवळपास दोनशे युवक युवतींनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.नवा मोंढा-महात्मा ज्योतिबा फुले स्मारक-कलामंदीर-एस.पी.कार्यालय-छ.शिवाजी महाराज स्मारक-महात्मा गांधी स्मारक-चिखलवाडी-हिंगोली गेट उड्डाणपुल-लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक ते नवा मोंढा या मार्गाने मॅरेथॉन स्पर्धा होती.या स्पर्धेत मुलांमध्ये प्रणव राठोड प्रथम,निवृत्ती गुडेवाड द्वितीय,सुजीत राठोड तृतीय तर मुलींमध्ये शिवानी बोकारे प्रथम, पुजा अरकुंडे द्वितीय,राणी राठोड तृतीय आली आहे.विजेत्या स्पर्धकांना प्रथम सात हजार, द्वितीय पाच हजार तृतीय दोन हजार रूपये बक्षीस व प्रशस्तीपत्र एकोणीस फेब्रुवारी रोजी नवा मोंढा नांदेड येथे होणा-या शिवजन्मोत्सव कार्यक्रमात देण्यात येणार आहे. कारण पळसाच्या पत्रावळीला आयुर्वेदीक गुणधर्म असल्याने जेवण लवकर पचन होते. एरवाद्या कार्यक्रमात आलेल्या पाहुण्यांना ताटात जेवण न देता पत्रावळीत सामूदायिक जेवण दिले जात होते. मात्र सध्या आधुनिकीकरणाच्या युगात ग्रामस्थ पळसाच्या पानांऐवजी नवीन (फॅशन) पद्धतीच्या गोंडस नावाखाली शरीरास अत्यंत हानिकारक असलेल्या थर्माकोल व प्लास्टिक पत्रावळींचा वापर जेवणावळींमध्ये आता मोठ्या प्रमाणात होत आहे.

# आरोग्य मित्र संघटनेचे धरणे आंदोलन




आरोग्य मित्र यांच्या अनेक मागण्या प्रलंबित असून याकडे लक्ष वेधून मागण्या सोडविण्यासाठी बेमुदत संप आणि धरणे आंदोलन सुरू करण्यात आले. अरोग्य मित्रांना दरमाह रू. २६ हजार वेतन देण्यात यावे व किमान वेतन कायद्यानुसार महागाई भत्ता देण्यात यावा, वेतनात दरवर्षी १० टक्के वाढ करण्यात यावी, अरोग्य मित्रांना पेट्रोल अलाउन्स देण्यात यावा, सर्व अरोग्य मित्रांना आजारपणाच्या रजा (एस. एल.) १०, किरकोळ रजा (सी. एल) १०, विशेष अधिकार रजा (पी. एल.) ३०, सणाच्या रजा सुट्या १० लागू कराव्यात यासह विविध मागण्यासाठी आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत भरण्यात आलेल्या आरोग्य मित्रांनी महाराष्ट्र आरोग्य कर्मचारी संघटना आणि आरोग्य मित्र यांनी बेमुदत संप आणि धरणे आंदोलन सुरू केले आह




# संस्कार शाळा हे लाईफ स्किल विकसित करणारे विद्यापीठ आहे : डॉ.कुलकर्णी

अनिश्चिततेने भरलेल्या या जगात आपल्याला जगायला शिकवते ती शाळा असते . संस्कार विद्यालय हे शिक्षणातून लाईफ स्किल विकसित करणारे विद्यापिठ आहे .असे प्रशंसनीय गौरव उद्गार संस्कार विद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी तथा संस्कार वाग्भूषण अर्थशास्त्र अभ्यासिका डॉक्टर अपर्णा कुलकर्णी यांनी व्यक्त केले . त्या संस्कार विद्यालयात संस्कार बहिःशाल व्याख्यानमालेत आपले विचार मांडत होत्या . याप्रसंगी संस्कार पीठासनावर पर्यवेक्षक श्री रघुनाथ तावरे जेव शिक्षक राजेश राजहंस विनायक जोशी प्रेरक वैद्य यांची विशेष उपस्थिती होती . प्रमुख मान्यवर डॉ कुलकर्णी (धर्माधिकारी) म्हणाल्या की,शाळेतूनच जगण्यासाठी अपेक्षित असणारे संस्कारांचे संचित



संस्कार विद्यालयाच्या मातीत दिसते ते इतरत्र कोठेही दिसत नाही . आपल्या जीवनामध्ये शिक्षण घेतलं म्हणजे नोकरी मिळते असे आता राहिलेले नाही आता शिक्षणातून आपण कौशल्य विकसित करून घेतले पाहिजे आयुष्याच्या विविध टप्प्यावर लाईफ स्किल विकसित झाले पाहिजे त्यातूनच आपला व्यक्तिमत्व विकास होणार आहे . केवळ गणित व इंग्रजी आलं म्हणजे व्यक्तिमत्व विकसित होणे नव्हे खरे तर आपल्याकडे असणार कौशल्यच आपणास वाचवणार आहे म्हणून विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच या कौशल्यांना विकसित करावे .विद्यार्थ्यांनी छोटा विचार न करता मोठा विचार करावा आपली शाळा हीच आपल्या जीवनाचा पाया रचत असते त्यामुळे आपणास शाळेविषयी ऋजूता असली पाहिजे . शालेय विद्यार्थ्यांनाच उद्याचे देशाचे धोरण ठरवावे लागणार आहे या विद्यार्थ्यांमधूनच भावी नेते तयार होणार आहेत . उत्तुंग विचार करण्याची शक्ती शाळा देत असते . नवीन आव्हाने पेलण्याची शक्ती शाळा देत असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी छोटी स्वप्न न पाहता मोठी स्वप्न पहावीत . आजचा विद्यार्थी बदलतो आहे तो गाव आणि देशामध्ये राहून शिकण्याची स्वप्न पहात नाही तर विदेशात जाऊन शिक्षण घेऊ इच्छित अमेरिकेने आपल्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांसाठी आपली सताड दारे उघडी ठेवली आहे . त्यामुळे विद्यार्थ्यांनी क्षमताधिष्ठित शिक्षण आत्मसात करावे व जीवनाचे उत्तुंग शिखर गाठावे असा हितोपदेश प्रमुख अतिथीने विद्यार्थ्यांना केला . सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रत्नपारखी व्ही.व्ही . यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने केले .प्रमुख अतिथिंचा परिचय श्री प्रेरक वैद्यसर यांनी तर प्रास्ताविक श्री विनायक जोशीसर यांनी केले . राष्ट्रगीत गायनाने सदरील कार्यक्रमाची सांगता झाली.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्ताने आज जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा

बीड दि. १८ ( जिमाका ) :- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने उद्या बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने जिल्हाभरात एकाच वेळी जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा निघणार आहे. हा उपक्रम देश पातळीवर देखील होत असून याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करणार आहेत. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी प्रमाणे राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून यंदापासून छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यानिमित्त निघणा-या पदयात्रेस येथील जिल्हा क्रीडा संकुलातून प्रारंभ होईल. आरंभी भारतमाता तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूजन करून संविधानाचे वाचन करण्यात येणार आहे. यानंतर पाच किलोमीटर अंतराची ही पदयात्रा शहरातील विविध मार्गातून जाईल. तत्पूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानिमित्त सर्वांना संदेश देणार आहेत. जिल्हास्तरावर बीड येथे तसेच सर्व तालुक्यांच्या ठिकाणी देखील या स्वरूपाच्या पदयात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी याबाबत घेतलेल्या एका आढावा बैठकीत दिली. जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा मार्ग केंद्र शासनाचा युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय तसेच महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.




राज्य व राष्ट्राच्या शाश्वत विकासात युवकांचे मोलाचे योगदान आहे. युवकांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होऊन व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवाभाव तसेच शासकीय उपक्रमाबाबत माहिती व सहयोग यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.सदरील पदयात्रा १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल सहयोग नगर, येथून निघणार असून ती सारडा कॉम्प्लेक्स चौक, शहर पोलीस स्टेशन चौक, सुभाष रोड मार्गे, भाजी मंडई चौक, बशीर गंज चौक व छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जाणार आहे. पदयात्रा सकाळी ९.०० वाजता सुरू होणार असून याचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे यात अधिकाधिक युवकांनी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. पदयात्रेबाबतचा आढावा आज एका बैठकीत शैलेश सूर्यवंशी यांनी घेतला. या बैठकीस शिक्षणाधिकारी तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी व स्काऊट गाईड तसेच एनसीसी आदींचे अधिकारी उपस्थित होते.

या पदयात्रेत नववी ते अकरावी वर्गातील स्काऊट गाईड विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थी, विद्यार्थिनी खेळाडू, नागरिक शासकीय अधिकारी-कर्मचारी आदी सहभागी होणार आहेत. यात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

*****

# बहिरवाडी येथे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात



दिनांक १६/०२/२०२५ रोजी प्रा शा बहिरवाडी येथे वार्षिक स्नेह संमेलन अतिशय उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मा केंद्र प्रमुख श्रीम सोनवणे मॅडम तर उदघाटक सरपंच श्री जितेंद्र बोबडे हे होते. विशेष अतिथी म्हणून ग्रामसेवक सकपाळ साहेब, केंद्रीय मुख्याध्यापक विजयकुमार समुद्रे, जिरेवाडीच्या मुख्याध्यापिका चव्हाण मॅडम, मा. पोव्हरे सर, श्रीम मोराळे मॅडम, श्री हंगे सर उपस्थित होते.त्या बरोबरच ग्रामपंचायत सदस्य श्री खंडू चादर, श्री क्षीरसागर, श्री शेलार हे देखील उपस्थित होते. विध्यार्थ्यांना विविध गीतांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात देवा श्री गणेशा गाण्याने झाली तर मोबाइल चा वापर कमी करावा हे सांगणारे मोबाईल गीत प्रेक्षकांना अंतर्मुख करून गेले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम शैलजा ओव्हाळ, शिक्षिका श्रीम मनीषा कांबळे, श्रीम स्वाती शिंदे, ट्रेनी शिक्षक श्री नितीन शेलार यांनी मेहनत घेतली.

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १९ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


## नवगण राजुरीत ३ लाखांचा गुटखा पकडला

**❋ बीड ग्रामीण पोलिसांची कारवाई ❋**



बीड ग्रामीण पोलीस परीक्षा संदर्भात गस्तीवर असताना नवगण राजुरी येथे एका संशयित कारची झडती घेतली असता त्यामध्ये गुटखा मिळून आला. गुटखा ३ लाख तर कार ५ लाख असा एकूण ८ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सोमवारी (दि.१७) इयत्ता १२ वी चा पेपर असल्याने ग्रामीण पोलीस ठाण्याचे एपीआय बाळराजे दराडे यांच्यासह कर्मचारी पोलीस ठाणे हद्दीतील परीक्षा केंद्रांना भेटी देण्यासाठी गस्तीवर होते. यावेळी जामखेड येथून एक लाल रंगाची कार नवगण राजुरी येथे गुटखा घेऊन येत असल्याची माहिती मिळाली. यावेळी पोलिसांनी गावात प्रवेश करणाऱ्या दोन्ही रस्त्यावर सापळा लावला अन् संशयित कार येताच त्याची झडती घेतली असता त्यामध्ये २० पोते गुटखा आढळून आला. यात विमल आणि राजनिवास हा गुटखा आहे. याची किंमत ३ लाख रुपये. तर कार स्विफ्ट व्हीडीआय ५ लाख असा एकूण ८ लाख रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी समाधान गीते यास ताब्यात घेण्यात आले.

# बीड जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त, माजलगाव न्यायालयाचा आदेश

## जमिनीचा मावेजा न मिळाल्याने जप्तीची कारवाई

माजलगाव : वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथे १९९८ मध्ये लघु सिंचन प्रकल्प उभारण्यात आला होता. मात्र १९९८ पासून संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा अद्याप मिळालाच नाही. त्यामुळे तीन शेतकरी हातबल झाले होते. शेतकऱ्यांनी अखेर कोर्टात धाव घेतली आणि कोर्टाने सर्व प्रकार समजून घेत चक्क जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्तीचे आदेश दिले. माजलगाव कोर्टाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या वाहनाच्या जप्तीच्या आदेश काढल्यानंतर जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयातून गाडी जप्त करण्यात





आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील चिखलबीड येथील शेतकरी शिवाजी टोगे, संतोष टोगे व बाबू मुंडे या शेतकऱ्यांची जमीन लघु सिंचन तलावासाठी शासनाने संपादित केली होती. या जमिनीचा अत्यंत तुटपुंजा मावेजा त्यांना देण्यात आला होता. त्यामुळे या शेतकऱ्यांनी माजलगाव येथील सत्र न्यायालयात धाव घेत यासाठी दावा दाखल केला होता. या दाव्यावर कोर्टाने संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे अंशतः मान्य करून दि. २९ ऑक्टोबर २०१५ रोजी या शेतकऱ्यांना वाढीव मावेजा देण्याचा निकाल दिला होता. मात्र, शासनाने काही प्रमाणात रक्कम देऊन संपूर्ण रक्कम देण्यास चालढकल केली. त्यामुळे सह दिवाणी न्यायाधीश यांनी या रकमेला व्याज लावून सदर रक्कम वसूल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दहा दिवसांपूर्वी पारित केले होते. त्यानुसार कोर्टाने वादी यांचे वकील यांना सोबत घेऊन मावेजाबाबत आपली बाजू मांडली व रक्कम अदा करण्यास सांगितले. मात्र, जिल्हाधिकारी यांनी पैशांची पूर्तता करू शकत नाही, तुम्ही गाडी घेऊन जा, असे सांगितल्याने कोर्टाने जिल्हाधिकारी यांची गाडी कायदेशीर बाबीची पूर्तता करून जप्त करून माजलगाव कोर्टात जमा केली. याप्रकरणी वादी शिवाजी टोगे, संतोष टोगे व बाबू मुंडे यांच्या वतीने ॲड. बाबुराव तिडके, एस.एस.मुंडे यांनी बाजू मांडली.

# सार्वजनिक शिवजयंती उत्सवात सहभागी व्हा आ.संदीप क्षीरसागरांचे बीडकरांना आवाहन



बीड :- दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी करण्यासाठी आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांनी याहीवर्षी शिवजयंती साजरी होणार आहे. शिवजयंती सोहळ्यास सर्व बीडकर बंधू-भगिनिंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे बीड शहरात आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनातून भव्य दिव्य आणि आगळ्यावेगळ्या स्वरूपात शिवजयंती साजरी केली जात आहे. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य आणि क्रीडा कार्यक्रमांच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे शिवजयंती साजरी होत आली आहे. दरवर्षी प्रमाणे बीडच्या सांस्कृतिक परंपरेनुसार सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर (चंपावती नगरी) च्या माध्यमातून दि.१९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शासकीय महापूजा आणि सायंकाळी ६:०० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ चे अध्यक्ष प्रा.श्री.सत्येंद्र पाटील, उपाध्यक्ष हाजी नसीम इनामदार व श्री.विष्णू वाघमारे, सचिव श्री.दिपक कर्नावट, कोषाध्यक्ष श्री.शिवाजी सानप, सहकोषाध्यक्ष सी.ए.श्री.संतोष आमटे व श्री.अशोक ठाकरे, प्रसिद्धी प्रमुख दिलीप खिस्ती तसेच सदस्य डॉ.प्रशांत गायकवाड, प्रा.कॅप्टन जगन्नाथ चव्हाण, श्री.अंकुश निर्मळ, श्री.प्रकाश वक्ते, प्रा.डॉ. रेखा ढेरे, डॉ.पुजा जाधव, श्री.सुमंत खांडे या सर्व समिती सदस्यांच्या चोख नियोजनाखाली यावर्षीची शिवजयंती ऐतिहासिक होणार आहे. तरी सर्व बीडकरांनी या शिवजयंती उत्सव सोहळ्यात सहभागी होऊन भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे साक्षीदार व्हा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आह

## जिल्हा प्रशासनाने मारले पण प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना तारले



बीड तालुक्यातील बालाघाटावरील मुळुकवाडी गावातील शेतकऱ्यांने शेतकऱ्यांच्या सहमती विना कोणताही मोबदला न देताच शेत जमिनीतुन रिन्यु ग्रीन एम.एच. पी.वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने आमच्या शेत जमिनीतुन माझ्या कुटुंबाच्या सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारणीसाठी पोकलेन, जेसीबी,जीप, पीक अप अशा विविध वाहनांची नियमबाह्य वाहतूक करत शेजजमीनीचे नुकसान करत असल्याची लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना दिली होती. मात्र जिल्हा प्रशासनाकडुन नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करण्यात आले. याविषयी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून आवाज उठवल्यानंतर पवनचक्की कंपनी ताळ्यावर आली आणि ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व साहित्य वाहतूक करणाऱ्या गाड्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मावेजा देण्यात आला यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाने मारले परंतु प्रसारमाध्यमांनी तारले अशी भावना शेतकऱ्यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवत प्रसारमाध्यमांचे आभार मानले. मुळुकवाडी येथील गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमिनी मधुन रिन्यु ग्रीन एम. एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने विनासहमती शेतातुन पवनचक्की उभारणीसाठी वाहनातुन साहित्य नेल्याने जमिनीचे नुकसान होत असुन प्रतिबंध घालण्यात यावा अशी तक्रार जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली होती. मात्र जिल्हा प्रशासनाने याची दखल घेतली नव्हती. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रसारमाध्यमांना याबाबत कल्पना दिल्यानंतर विविध दैनिकात याबाबत बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. अखेर पवनचक्की कंपनीचे अधिकारी यांनी पवनचक्कीशी संबंधित गट क्रमांक.६४३, ६४५, ६४८, ६४९, ६५०, ६५१ मधील सर्वच शेतकऱ्यांना ज्यांच्या शेतजमिनीतुन वाहनांची वाहतुक होते त्यांना प्रति गुंठा १५ हजार रुपये मावेजा व ज्या शेतकऱ्यांचे ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई दिली आहे.त्यामुळे एकंदरीतच प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे. जिल्हा प्रशासनाची जबाबदारी प्रसारमाध्यमांनी पार पाडली असे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले आह

# ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय आत्मनिर्भरता अशक्य- नितीन गडकरी

सांगली । शहराबरोबरच ग्रामीण भागाचा जोपर्यंत विकास होत नाही तोपर्यंत देश आत्मनिर्भर होउ शकत नाही. यासाठी ग्रामीण भागासाठी चांगले रस्ते, पाणी आणि वीज या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी इस्लामपूर येथे बोलताना केले.इस्लामपूर येथे राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी या स्वायत्त अभियांत्रिकी संस्थेच्या नवीन विद्यार्थी वसतीगृह इमारतीचे आणि जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक व्यायामशाळेचे उद्घाटन केंद्रिय मंत्री गडकरी यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री आ. जयंत पाटील, खा. विशाल पाटील, आमदार सर्वश्री सुरेश खाडे, अरूण लाड, रोहित पाटील, सुहास बाबर, माजी आमदार मानसिंगराव नाईक, शिवाजीराव नाईक, संस्थेचे अध्यक्ष भगतसिंह पाटील, राजारामबापू कारखान्याचे



अध्यक्ष प्रतिक पाटील आदींसह जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित होते.


यावेळी बोलताना मंत्री गडकरी म्हणाले, महात्मा गांधी ९० टक्के लोक खेड्यात राहतात असे सांगत होते. मात्र, आज यापैकी ३५ टक्के लोक शहराकडे स्थलांतरित झाले आहेत. हे स्थलांतर आनंदाने झालेले नाही, तर सुविधांच्या अभावाने झाले आहे. यातून शहरी भागात झोपडपट्ट्या निर्माण झाल्या. जीडीपीमध्ये २२ ते २४ टक्के वाटा उद्योगाचा, ५२ ते ५४ टक्के सेवाक्षेत्राचा आहे, तर केवळ १४ टक्के वाटा ग्रामीण व शेतीचा आहे. जर ग्रामीण भागाचा विकास साधायचा असेल तर चांगले रस्ते, वीज, पाणी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. हे झाले तरच भारत आत्मनिर्भर होउ शकतो.

या प्रकरणात मी शेवटपर्यंत लढा देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कुणीतरी अतिशय व्यवस्थितपणे यामध्ये षडयंत्र रचले आहे. ज्यांनी षडयंत्र रचले, त्यांचा मी बंदोबस्त करणार, असा इशाराही धस यांनी दिला होता.

# शिवजन्मोत्सवानिमीत्त विविध कार्यक्रम ज्ञानेश महाराव यांचे व्याख्यान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व इतर कक्षाच्या वतीने सार्वजनिक शिवजन्मोत्सव गेल्या कित्येक वर्षांपासून अखंडपणे नवामोंढा येथे भव्य स्वरुपात होत असतो.त्याचप्रम ाणे याहीवर्षी १९-फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रम ासह भव्य मिरवणुकीची नियोजन आहे तसेच प्रसिद्ध व्याख्याते ज्ञानेश महाराव यांचे व्याख्यान होणार आहे.गेल्या अनेक वर्षांपासून नवामोंढा नांदेड येथे शिवजन्मोत्सवानिमीत्त विविध कार्यक्रम होत असतात.दिनांक १९फेब्रुवारी रोजी सकाळी १०-वाजता मुख्य कार्यक्रम होईल.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य खा.अशोक चव्हाण , उद्घाटक म्हणून आ.प्रताप पाटील चिखलीकर तर जिल्हा राज्य मंत्रि खा.हेमंत पाटील,खा.रविंद्र चव्हाण,खा.नागेश पाटील,खा.अजित गोपछडे,आ.बालाजी कल्याणकर,आ.राजेश पवार,आ.तुषार राठोड,आ.आनंद बोंढारकर,आ. भिमराव केराम,आ.जितेश अंतापुरकर, बाबुराव कदम कोहळीकर,आ.श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,पोलिस अधीक्षक अविनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल,अधिक्षक अभियंता संभाजी धोत्रे,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आयुक्त महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर,उप वनसंरक्षक केशव वाबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता इंजि.रामकृष्ण गळधर, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता इंजि.आशिष चौगले,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी मंजुषा कापसे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशिलकुमार नायक,परभणी जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम, मराठा सेवा संघाचे प्रदेश महासचिव प्रा डॉ पंजाब चव्हाण, मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष इंजि.शे.रा. पाटील, मराठा सेवा संघाचे वस्तिगृह कक्षाचे अध्यक्ष मधुकर देशमुख, कृषी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सोपानराव क्षिरसागर, जिजाऊ ब्रिगेड च्या प्रदेश उपाध्यक्ष सरस्वती धोपटे,मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक शिवाजी खुडे,इंजि.सुदेश देशमुख,इंजि,व्ही.टी.शिंदे, संभाजी ब्रिगेड चे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील आदि प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. यावेळी शाहीर शिवराज शिंदे यांच्या पोवाड्याचाही यावेळी आयोजन करण्यात आले आहे.तसेच शिवजन्मोत्सवानिमीत्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण होईल.मराठा भुषण पुरस्कार स्वच्छतादुत म ाधवराव शेळगावकर,डॉ.शुभांगी देवसरकर यांना डॉ रख्माबाई सावे पुरस्कार,गिरजाबाई आगळे यांना जिजाऊ रत्न पुरस्कार, मराठा सेवा संघ कृषीभुषण पुरस्कार बळीराम पाटील कामळजकर यांना तर खाशबा जाधव क्रिडारत्न पुरस्कार शिवतेज शिरफुले यांना देण्यात येणार असुन त्यानंतर भव्य मिरवणूकीस सुरुवात होईल या मि रवणुकीत विविध देखावे, लेझीम पथक,लाठीकाठी पथक, तलवारबाजी पथक, शिवकालीन देखावे, ढोलताशा पथक,भजनी मंडळ आदिंचा समावेश असेल. या शिवजन्मोत्सवास हाजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवजन्म ोत्सव समिती चे अध्यक्ष ॲड बालाजी वाघमारे,



स्वच्छतादूत माधवराव शेळगावकर यांना मराठा भूषण पुरस्कार,डॉ.शुभांगी देवसरकर यांना डॉ.रखमाबाई सावे पुरस्कार,गिरजाबाई आगळे यांना जिजाऊ रत्न पुरस्कार,बळीराम पाटील कांबळजकर यांना मराठा सेवा संघ कृषीभूषण पुरस्कार तर शिवतेज शिरफुले यांना खाशीबा जाधव क्रीडारत्न पुरस्कार

स्वागताध्यक्ष तथा मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडीत कदम,प्रसिद्धी प्रमुख बालाजी सिरसाट,म राठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष सतीश जाधव,म राठा सेवा संघ नानाराव कल्याणकर,उद्धव सुर्यवंशी,डॉ. राधाकृष्ण होगे,संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष परमेश्वर पाटील,भगवान कदम,सुभाष कोल्हे,रमेश पवार, प्रल्हाद दुरपडे,शिवाजी बामणीकर,शिवाजी आलेगावकर,पंडीत पवळे, हौसाजी गाढे,आंकुश कोल्हे,जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुमित्रा वडजकर,जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष कल्पना चव्हाण,प्रदीप गुबरे, इंजि प्रवीण जाधव, डॉ विद्या पाटील अरूणा जाधव ,वनिता देवसरकर, आदिंसह इतरांनी केले आहे. तिच्या गुणांना, मतांना घरात आणि समाजातही किंमत आहे. विविध क्षेत्रे तिने पादक्रांत केली. स्त्रीची सुरक्षितता हा जरी नाजूक मुद्दा असला तरी आत्मविश्वासाने आज ती व्यक्त होत आहे. काही लोकांच्या वाईट मानसिकतेमुळे संपूर्ण समाजाला त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी प्रत्येकाने मुलांना लहानपणापासूनच महिलांचा सन्मान करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ लोखंडे बी. बी. यांनी केले. तर आभार सहशिक्षिका श्रीमती रुपाली मंगरुळे यांनी मानले. या कार्यशाळेला बहुसंख्य महिलांनी प्रतिसाद दिला तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थीनिनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवल तीने आमच्या घरासमोरील सोने काढण्यासाठी या ना त्या कारणावरून सारखे आमच्याकडून वेळोवेळी जवळपास अकरा लाख रुपये घेतले घेतले. या प्रकरणी पीएसआय भोजगुडे यांनी तपास करतभोंदू महिलेस अटक करून रुपये बाबत विचारले असता ते सर्व रुपये ऑनलाईन गेम्स मध्ये हरले असल्याचे?सांगितले. सध्या भोंदू महिला न्यायालयीन कोठडीत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com